# प्रा.एस.एस.गावीत

(सहा. प्राध्यापक)

(M.A,B.ed,SET,NET)

## पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव, जि-सांगली.


## विषय – मृदा(भारतातील मृदेचे प्रकार )

# प्रस्तावना

- मृदा हा महत्त्वाचा घटक आहे. या अंतर्गत **मृदेची निर्मितीची प्रक्रिया**, मृदेमध्ये आढळणारी **खनिजे व पोषणमूल्ये**, **जमिनीची होणारी धूप**, **धूप होण्याचे प्रकार**, भारतातील मृदेचे **वितरण** व **मृदा संवर्धनाचे उपाय** या घटकांचा समावेश होतो.
- **व्याख्या**: मूळ खडकाचे अपक्षय (विदारण) होते. त्यामध्ये सेंद्रिय द्रव्ये मिसळली जातात. मृदांच्या कणांमध्ये असणाऱ्या पोकळीत वायू भरलेला असतो आणि काही प्रमाणात पाण्याचाही अंश असतो. अशा संयुक्त घटकांनी निर्माण होणाऱ्या पदार्थाला '**मृदा**'असे म्हणतात.

## 1) गाळाची मृदा

- भारतीय उपखंडाच्या खंडांतर्गत भागात नद्यांनी वाहून आणलेला गाळ व सागर किनारपट्टीवर सागरी लाटांच्या कार्यामुळे गाळाची मृदा तयार झाली आहे.
- प्रामुख्याने सतलज-गंगा-ब्रह्मपुत्रा नद्यांच्या मदानी प्रदेशात गाळाची मृदा आढळते. उत्तर भारतात पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, बिहार, आसाम राज्यात गाळाची मृदा आहे.

उत्तरेकडील मदानी प्रदेशात गाळाच्या संचयन काळानुसार त्याचे दोन उपप्रकार आहेत : जुनी

# २. काळी मृदा/ रेगूर मृदा

दख्खनच्या पठारावर काळी मृदा आढळते. तिला रेगूर मृदा या नावानेही ओळखतात.

- बेसॉल्ट व ग्रॅनाइट खडकांचे विदारण होऊन काळी मृदा तयार झाली आहे. महाराष्ट्रात काळी मृदा विस्तृत प्रमाणात आढळते.
- कर्नाटकात उत्तरेकडे या मृदेचा रंग अधिक काळा होत जातो. आंध्र प्रदेशात गोदावरी व कृष्णा खोऱ्यात खोल काळी मृदा आढळते.
- या मातीत लोह, अॅल्युमिनिअम व हयूमसचे प्रमाण जास्त असते. तसेच टिटॅनी फेरस मॅग्नेटाइट (मुख्यत: टिटॅनिअम) मुळे त्या मृदेला काळा रंग प्राप्त झालेला आहे. उन्हाळ्यात या जमिनींना भेगा पडतात. मोसमी काळात पावसाच्या पाण्याने या मृदा फुगतात.

# पिके

- काळ्या मृदेतून खरीप व रब्बी पिकांचे उत्पादन घेतले जाते. कापूस, ऊस, तंबाखू यांसारख्या नगदी पिकांचे उत्पादन घेतले जाते, तृणधान्ये, तेलबिया, विविध प्रकारचा भाजीपाला, संत्री- मोसंबी- द्राक्षांसारखी फळे
  पिकवली जातात.
- या जमिनीची ओलावा धरून ठेवण्याची क्षमता जास्त असल्याने कोरडवाहू शेतीसाठी ही जमीन आदर्श मानली जाते.

## 3) जांभा मृदा

- **राज्ये**: सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर, पूर्व घाट, राजमहल टेकडयांवर, केरळ, कर्नाटक तसेच महाराष्ट्रातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये राधानगरी, आंध्रप्रदेशात मेडक, ओडिशात मयूरभंज येथे जांभा मृदा आढळते.
- **प्रदेश**: उष्ण कटिबंधीय प्रदेशात आद्र हवामानात जांभा जमीन तयार होते.
  - **व्याख्या**: पावसाचे प्रमाण २०० सें.मी.पेक्षा जास्त असल्याने खडकाचे अपक्षरण होते. खडकामधील सिलिकांवर अपक्षयाची क्रिया होऊन लिचिंगची प्रक्रिया व त्यापासून आयर्न ऑक्साइड तयार होते. अशा तांबूस पिवळसर जमिनीस '**जांभा मृदा**' असे म्हणतात.

- अॅल्युमिनिअम ऑक्साइड व लोह ही द्रव्ये या मृदेत असतात. ही मृदा फारशी सुपीक असत नाही. परंतु खताला लगेचच आणि चांगला प्रतिसाद देते.
- या मृदेतून नाचणी, भात, कडधान्ये, ऊस ही पिके तसेच आंबा, काजूसारखी फळझाडे चांगली वाढतात.